N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - 1)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** मंगरूळपीर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0184 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/03/2024 01:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 21/03/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/03/2024

**Time From (वेळेपासून):** 14:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/03/2024 **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/03/2024 01:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कवठळ फाटा मंगरूळपीर मानोरा रोड,मंगरूळपीर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

नक्कल लेखी फिर्याद पोस्टे मंगरुळपीर दि.21.03.2024 नाव - आकाश किसन टोपले. वय 28 वर्षे, व्यवसाय - वाहन चालक रा. गिरोली ता. मानोरा जि. वाशिम, मो.नं.9604583726 (व्हीआय). मी वरील ठिकाणी राहत असुन मागील दिड वर्षापासुन पुणे येथे पिकअप वाहनावर वाहन चालक म्हणुन काम करतो. दि.18.03.2023 रोजी मी पोलीस निरीक्षक एस.यु.कांबळे अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय वाशिम यांना लाचमागणी संबधी तक्रार असल्याचे सांगतले असता त्यांनी मला सकाळीच आम्ही, पंच व स्टाफ तुमचे गावाजवळ तक्रार घेण्यासाठी येतो असे सांगीतले. दि.19.03.2023 रोजी पो. नि.कांबळे साहेबांच्या सांगणे प्रमाणे मी कवठळ फाटा मंगरुळपीर ते मानोरा रोड येथे गेलो असता तेथे मला पोलीस पोलीस निरीक्षक एस.यु.कांबळे लाप्रवि वाशिम हे भेटले यांचे कडे मी माझी लाच मागणी बाबत तक्रार सांगितली असता त्यांनी माझी तक्रार ऐकुन घेउन पंचासमक्ष माझी तक्रार मला स्वतःचे हस्ताक्षरात लिहीण्यास सांगीतली असता ती मी माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर दोन्ही पंच, तक्रारदार म्हणून माझी व पो.नि. एस.यु.कांबळे यांनी सह्या केल्या ती तक्रार पुढील प्रमाणे - "मी समक्ष येऊन तक्रार देत आहे की, मी वरील ठिकाणी राहत असुन मागील दिड वर्षा पासुन पुणे येथे पिकअप वाहनावर वाहन चालक म्हणुन काम करतो. माझे शिक्षण बारावीपर्यतचे झालेले आहे. 2023 मध्ये दिवाळीनंतर मी दिग्रस येथुन स्वतःचे नावावर व्हिआय कंपणीचे सिमकार्ड माझे पत्नीसाठी खरेदी केले होते. मी सिमकार्ड विकत घेतल्यानंतर तेव्हाच दुकानदाराच्या मोबाईलमध्ये टाकुन सुरु झाले किंवा नाही हे चेक केले होते. त्यानंतर अंदाजे सात दिवसांनी माझे पत्नीचे मो.क्र. 766893003 यावर फोन आल्यानंतर तिने माझा वरील नंबर त्यांना दिला. दोन तासानंतर मला मो.क्र. 9822776172 यावरुन पोलीस कॉन्स्टेबल मंगेश गादेकर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, मंगरुळपीर यांचा फोन आला. त्यांनी मला सांगीतले की, तुम्ही चोरीचा मोबाईल वापरत आहात. त्यावेळेस मी त्यांना म्हटले की, मी दिग्रस येथुन सिमकार्ड खरेदी केल्यानंतर ते सुरु झाले की नाही हे पाहण्याकरीता मोबाईल दुकानदार यांच्याच मोबाईल मध्ये माझे सिम टाकले होते. मी कोणत्याही प्रकारचा मोबाईल चोरी केलेला नाही. त्यावर पोलीस कॉन्स्टेबल मंगेश गादेकर मला म्हणाले तुम्ही पोलीस स्टेशन मंगरुळपीर येथे येवुन सेटलमेंट करुन घ्या नाहीतर तुमच्यावर गुन्हा दाखल करेन. मी पुणे येथे माझ्या कामात व्यस्त असल्याने पो.स्टे. मंगरुळपीर येथे जावू शकलो नाही. त्यानंतर अंदाजे एक महिन्यानंतर पून्हा पोलीस कॉन्स्टेबल मंगेश गादेकर यांचा मला फोन आला तेव्हा त्यांनी मला म्हटले की, तुम्ही पो.स्टे. मंगरुळपीरला या, नाही आले तर तुमच्यावर गुन्हा दाखल होईल. त्यानंतरही मी पो. स्टे. मंगरुळपीरला न गेल्याने अंदाजे पंधरा दिवसापूर्वी पोलीस कॉन्स्टेबल मंगेश गादेकर यांचा मला फोन आला तेव्हा त्यांनी मला म्हटले की, तुम्ही आत्ताच पो.स्टे.मंगरुळपीर येथे या व 5000/-रु. देवून सेटलमेंट करा नाहीतर तुमच्यावर गुन्हा दाखल करुन तुम्हाला जेलमध्ये टाकेल. माझी पोलीस कॉन्स्टेबल मंगेश गादेकर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, मंगरुळपीर यांना पैसे देण्याची इच्छा नाही. पोलीस कॉन्स्टेबल मंगेश गादेकर यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुश्मनी नाही. मंगेश गादेकर यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी या करीता तक्रार देत आहे. कारवाई होणेस विनंती आहे."

सदर तक्रार लिहुन दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री एस.यु.कांबळे यांनी मला पडताळणी कार्यवाही बाबत, तसेच मेमरी कार्ड व व्हाईस रेकॉर्डरचे कार्यप्रणाली बाबत समजावून सांगितले. सदर तक्रारीवरुन दि.19.03.2024 रोजी मला, पंच क्र.1 श्री मदन जाधव यांचे सह पोलीस कॉन्स्टेबल मंगेश गादेकर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, मंगरुळपीर यांचे भेटीकरीता व्हाईस रेकॉर्डर लावुन पाठवून पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्डमध्ये आमच्या भेटी दरम्यानचे संभाषण रेकार्ड झाले आहे.

माझी पोलीस कॉस्टेबल मंगेश गादेकर यांच्याशी भेट झाल्यानंतर गादेकर साहेब मला म्हणाले की, कायदेशीर रित्या केलं तर तुझ्यावर 411 आय.पी.सी. नुसार गुन्हा दाखल होते, लिगली जर केलं तर. मोबाईल मालकाला उद्देशुन मी गादेकर साहेबांना म्हणालो, त्यांनी तं तुम्हाला काही सांगीतलं असल नं त्या मानसानं. यावर गादेकर साहेब म्हणाले, त्याच म्हणनं कसं आहे अकरा हजार रुपयाचा मोबाईल आहे ते म्हणे मले कम से कम पाच साडेपाच हजार रुपये

भेटले पाहीजेत. यावर मी त्यांना म्हणालो, 5000 म्हणलं कुठन दयावं. यावर गादेकर साहेब म्हणाले, नाही नाही पाच नाही तू म्हणशील तेव्हढे बाकी पैसे मी टाकीनं तू टेंशन नको घेवू, मला काय करायचे ते पाहिन मी एखादा धंदयावाला पाहिन काही पाहीन, तू सांग तू किती देवू शकतो, तू जे म्हणशील ते होईल. यावर मी त्यांना म्हणालो, 2000 रुपये करुन टाकू. यावर गादेकर साहेब म्हणाले, ठिक आहे काही हरकत नाही. नंतर केसला उद्देशुन मी त्यांना म्हणालो, परत हे नाही झालं पाहिजे. यावर गादेकर साहेब म्हणाले, काय म्हणायचं मी मंगेश गादेकर यांचे कडे मोबाईल दिला संपला विषय, चला मग पैसे कधी. यावर मी त्यांना म्हणालो, पैसे कधी आजच दावे लागतील का. यावर गादेकर साहेब म्हणाले, ताबडतोब आजच दयावे लागतात, एटीएम आणायचे काय आणायचे ते आणं. नंतर गादेकर साहेब माझ्या फोन पे ला उद्देशुन म्हणाले, याच्यात किती आहेत. मी म्हणालो, चारशे पन्नास. यावर गादेकर साहेब म्हणाले, एखादयालं फोन करनं म्हणा फोन पे, तू एटीएम सोबत आनलं नाही का, तूझ्या मित्राकडून काही पाहयनं काही फोन करुन, गावातील मित्र पाहयनं तूहया. यावर मी त्यांना म्हणालो, गावातून कोनाकडून 2000 रुपये भेटत नाहीत. नंतर गादेकर साहेब म्हणाले, फोन पे त टाकता येणार नाही का. काही वेळानंतर गादेकर साहेब म्हणाले, फोनपे च ठेवायच गुगल पे नाही. पून्हा काही वेळानंतर गादेकर साहेब म्हणाले, इथं जेवाला आलता का तू, जावू दे नंतर कर नंतर कर आपण ऐवढी सुट देवून भी काम करत नाही, अशा प्रकारे मंगेश गादेकर यांनी मला 2000/-रु. लाच रकमेची मागणी केली. त्याच दिवशी दि.19.03.2024 रोजी पोलीस कॉन्टेबल मगेश गादेकर यांचा मला संध्याकाळी फोन आला आणी म्हणाले की तु आता कॅश आणु नको समोरच्या सोबत सेटलमेंट झालय माझं चहापाण्याचं बघ असे सागीतले. मंगेश गादेकर यांचे फोनबाबत पोनी कांबळे साहेब यांना सांगीतले तसेच पैश्याची व्यवस्था झाल्यावर फोन करतो असे सांगीतले.

दि.21/03/2024 रोजी सकाळी मी पो.नि.कांबळे साहेब यांना फोनवर सांगीतले की, पैशाची व्यवस्था झालेली आहे. त्यावरुन पो.नि.कांबळे पंच व स्टॉफ हे कवठळ फाटयावर आले. पोनी कांबळे यांनी मला पोलीस कॉन्टेबल मंगेश गादेकर यांचे फोन बाबत सविस्तर विचारले. मी त्यांना सांगीतले की पोलीस कॉन्टेबल मंगेश गादेकर हे कॅश पैसे स्विकारणार नाहीत त्यांनी मला पडताळणी दरम्यान फोन पे करणे बाबत तगादा लावला होता. व फोनवर मला चहापाणी करण्यास सांगीतले. पोलीस कॉन्स्टेबल मंगेश गादेकर यांना 2000 रु लाच रक्कम फोन पे करणे बाबत पो.नि.कांबळे साहेब यांना विनंती केली.

गादेकर साहेब यांनी पडताळणी दरम्यान व संध्याकाळी केलेल्या फोन नुसार त्यांनी फोन पे करण्याबाबत सांगीतल्याने पोलीस कॉन्स्टेबल गादेकर साहेब यांना माझे मोबाईल वरुन 2000 रु फोन पे करावे असे ठरले. त्यानंतर मी पंचासमक्ष आलोसे पोलीस कॉन्स्टेबल मंगेश गादेकर यांना 2000 रु फोन पे केले. त्यानंतर पोनि काबंळे यांनी मला गादेकर साहेब यांची भेट घेवून फोन पे केल्याबाबत संभाशण करुन भेट झाल्यानंतर व्हॉट्सअप वरुन ल्ः असा मॅसेज करण्याची सूचना दिली. त्यानंतर मला व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्रमांक 1 मदन जाधव यांचे सोबत आलोसे मंगेश गादेकर यांचे भेटी करीता उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय मंगरुळपीर येथे पाठवुन सापळा कारवाई केली. सापळा कारवाई दरम्यान माझी गादेकर साहेबांसोबत भेट होवून बोलणी दरम्यान मी पोनि कांबळे यांना ल्ः असा व्हॉट्सअपवर मॅसेज केला. त्यानंतर पोनि कांबळे हे सापळा पथकासह उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय मंगरुळपीर येथे आले व त्यांनी आलोसे पोलीस कॉन्स्टेबल मंगेश सुरेश गादेकर ब.नं. 88, नेमणुक पो.स्टे. आसेगाव सलग्न उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय मंगरुळपीर यांना त्यांचे कार्यालयात पंचासमक्ष ताब्यात घेतले.

दि.19/03/2024 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे पोलीस कॉन्स्टेबल मंगेश सुरेश गादेकर यांनी माझे विरुध्द भां.द.वि.कलम 411 प्रमाणे गुन्हा दाखल न करण्याकरीता तसेच सहकार्य करण्याकरीता 5000 रु लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 2000 रु. रोखीने किंवा फोन पे व्दारे स्विकरण्याची तयारी दर्शविली. आज दि.21.03.2024 रोजी 14/05 वाजता पंचासमक्ष आलोसे पोलीस कॉन्टेबल मंगेश गादेकर यांना 2,000/- रुपये लाचेची रक्कम फोन पे व्दारा दिली. सापळा कारवाई दरम्यान आलोसे पोलीस कॉन्स्टेबल यांना ताब्यात घेण्यात आले. म्हणुन माझी गै.अ.मंगेश सुरेश गादेकर वय 35 वर्ष व्यवसाय नोकरी, पोलीस कॉनस्टेबल बनं.88 नेमणुक पो.स्टे.आसेगाव सलग्न उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय मंगरुळपीर जि.वाशिम यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद पोहवा.योगेश खोटे यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहीली माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे. अशा लेखी फिर्याद वरून सदरचा गुन्हा दाखल

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आकाश किसन टोपले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ग्राम गिरोली ,मानोरा ,मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ग्राम गिरोली ,मानोरा ,मानोरा ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9604583726

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मंगेश सुरेश गादेकर ब.नं. 88 | | | 1. आयडिया टॉवर जवळ शहापुर, मंगरूलपीर ,मंगरूळपीर,वाशिम, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**ction taken: Since the above information reveals commission of ffence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SUDHAKAR BHAUSING ADHE(I (Inspector)) / 15101000402SBAN7701X **or** (किंवा)

**2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Akash.

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफीसर
पो.स्टे.मंगरुळपीर जि.वाशिम

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SUDHAKAR BHAUSIN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402SBAN770